## बालगृहातून मुलगा बेपत्ता

**छत्रपती संभाजीनगर :** हडको एन-१२ येथील बालगृहातून एक १६ वर्षीय मुलगा बेपत्ता झाल्याचा प्रकार १२ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता घडला. याप्रकरणी बालगृहातून मुलाला पळवून नेणाऱ्या अज्ञाताविरोधात सिटीचौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फय्याजोद्दीन गौसोद्दीन शेख (४०, रा. शरीफ कॉलनी, रोशनगेट) हे बालगृहात काळजीवाहक म्हणून कर्तव्यावर आहेत. बालगृहात रखवालीत अनाथ, मिसिंग व विधीसंघर्ष बालके असे सुमारे ४१ मुले होते. बेपत्ता झालेला १६ वर्षीय मुलगा हा १६ ऑक्टोबर २०२४ पासून बालगृहात राहत होता. तो १२ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता बालगृहातील मुले आंघोळ करीत होती. आंघोळ झाल्यावर सकाळी ७ वाजता त्यांची मोजणी करताना ४१ ऐवजी ४० मुलेच असल्याचे शेख यांच्या निदर्शनास आले. त्यांनी इतर मुलांना बेपत्ता १६ वर्षीय मुलाबाबत विचारपूस केली. तसेच बालगृहाच्या आजूबाजूच्या परिसरासह बसस्थानक, रेल्वे स्टेशन आदी ठिकाणीदेखील त्या बेपत्ता मुलाचा शोध घेतला. मात्र, तो सापडला नाही. त्यामुळे बालसुधारगृहाचे अधीक्षक चंद्रभान जंगले यांना फोनद्वारे कळवली. या प्रकरणी सिटीचौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि.

(मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)
*जीवन करा समृद्ध!*

**रजिस्टर्ड ऑफिस :** 'कॉसमॉस टॉवर', पहिला मजला, प्लॉट नं. ६, आयसीएस कॉलनी, युनिव्हर्सिटी रोड, गणेशखिंड, शिवाजीनगर, पुणे-४११ ००७.
पुणे ऑफिस फोन : ०२०-६७०८६७४७/६७०८५३१९, मो.: ९०११०७००९७

### दि सिक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेट्स अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरीटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि त्यासह वाचण्याच्या सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ मधील रुल ८(६) व ६(२)च्या अटींनुसार जंगम व स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव सूचना.

सर्व सामान्य जनता आणि विशेषत: कर्जदार, भागीदार, जामीनदार व गहाणदार यांना सूचना देण्यात येते की, खाली नमूद केलेली जंगम व स्थावर मिळकत ही तारण धनकोकडे गहाण आहे, जिचा **प्रत्यक्ष ताबा** अधिकृत अधिकारी, दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि. यांनी घेतला आहे. ती **''जसे आहे जेथे आहे'' ''जे आहे जसे आहे''** आणि **''तेथे जे आहे''** या तत्त्वावर **दि. ०४.०१.२०२५ रोजी दु. १२.३० ते २.३० या वेळेत** ५ मिनिटांच्या अमर्यादित मुदतवाढीसह विक्री करण्यात येणार आहे.

| कर्जदार / भागीदार / गहाणदार /जामिनदार यांचे नांव आणि शाखा | १३(२) मागणी नोटीस तपशिल | | ताबा दिनांक | विक्री/ई-लिलाव तपशिल | |
|---|---|---|---|---|---|
| | दिनांक | मागणी नोटीस रक्कम | | दिनांक | वेळ |
| **मे. सन्मती स्टील्स् (भागीदारी संस्था)**<br>**पत्ता -** प्लॉट नं. एच्-५/१, एमएसईबी मेजर स्टोअर्स् समोर, गजानन हॉटेल शेजारी, एम.आय.डी.सी., चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर.<br>**श्री. शैलेश नेमिचंद कासलीवाल (भागीदार/जामीनदार)**<br>**सौ. मंजूषा शैलेश कासलीवाल (भागीदार/जामीनदार)**<br>**दोघे रा.:** रो हाऊस नं. १५ व १६, प्लॉट नं. ७, हरे राम हरे कृष्ण हाऊसिंग सोसायटी, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर.<br>**श्री. विजय ब्रिंदावन मित्तल (जामीनदार)**<br>**पत्ता:** ३१२, हरेकृष्ण, प्रियदर्शनी कॉलनी, संभाजी नगर, जालना.<br>**श्री. पंकजकुमार कैलाशचंद्र जैन (जामीनदार)**<br>**पत्ता:** आरएच-१३, चंद्रगुप्त नगर, चाणक्यपुरी मागे, शानूरवाडी, छत्रपती संभाजीनगर.<br>**शाखा -** छत्रपती संभाजीनगर. | १०.१०.२०१६ | ₹ ३,१८,४५,१२३.३२ + पुढील व्याज आणि इतर चार्जेस | २५.०७.२०१९ | ०४.०१.२०२५ | दुपारी १२:३० ते २.३० वा. |

**स्थावर मालमत्तेचे वर्णन - परिशिष्ट-I**

मौजे चिकलठाणा एम.आय.डी.सी., एमएसईबी मेजर स्टोअर्स् समोर, गजानन हॉटेल शेजारी, छत्रपती संभाजीनगर या औद्योगिक वसाहती मधील प्लॉट नं. एच्-५/१, यांसी क्षेत्रफळ २१०० चौ. मी. व त्यावरील ९७९.६६ चौ. मी. बांधकाम ही मिळकत व त्याचे इतर सर्वसाधारण हक्कांसहीत.

| राखीव किंमत | बयाणा किंमत |
|---|---|
| **₹ ३,०३,५१,०००.००** (₹ तीन कोटी तीन लाख एक्कावन्न हजार फक्त) | **₹ ३०,३६,०००.००** (₹ तीस लाख छत्तीस हजार फक्त) |

**जंगम मालमत्तेचे वर्णन - परिशिष्ट-II**

प्लॉट नं. एच्-५/१, मौजे चिकलठाणा एम.आय.डी.सी., एमएसईबी मेजर स्टोअर्स् समोर, गजानन हॉटेल शेजारी, छत्रपती संभाजीनगर येथील फॅक्टरी मधील स्टील बार, पट्टी, रॉड उत्पादनाकरीता लागणारी मशिनरी उदा. रोलिंग मिल्स्, फर्नेस, कोल पलव्हरायझर, कटिंग मशिन्स्, वेल्डींग मशिन्स्, इलेक्ट्रीकल चेन होस्ट, कुलिंग टॉवर, कुलिंग बेड, पोल्युशन कंट्रोल युनिट, एअर कंप्रेसर, फॅन्स्, ट्रान्सफॉर्मर आणि इलेक्ट्रीफिकेशन, इ.

| राखीव किंमत | बयाणा किंमत |
|---|---|
| **₹ १,४८,३२,०००.००** (₹ एक कोटी अठ्ठेचाळीस लाख बत्तीस हजार फक्त) | **₹ १४,८४,०००.००** (₹ चौदा लाख चौऱ्याऐंशी हजार फक्त) |

**टीप: १.** संपूर्ण स्थावर आणि जंगम मालमत्ता खरेदी करण्यास इच्छुक असलेल्या बोलीदारास प्रथम प्राधान्य दिले जाईल आणि त्यानंतर जंगम व स्थावर मालमत्तेची स्वतंत्र बोली विचारात घेतली जाईल. **२.** मालमत्तेची पाहणी **दि. २४.१२.२०२४ रोजी सकाळी ११.३० ते दुपारी ३.३०** दरम्यान किंवा पूर्वनियोजित वेळेनुसार करता येईल. **३.** टेंडर फॉर्म्स अधिकृत अधिकारी यांचेकडे उपलब्ध आहेत. **४.** ई-ऑक्शन संदर्भात अधिक माहितीसाठी अधिकृत अधिकाऱ्यांशी वर नमूद केलेल्या क्रमांकावर संपर्क साधावा. **५.** बयाणा रक्कम (EMD) डिमांड ड्राफ्ट / आरटीजीएस / एनईएफटी द्वारे 'दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि.' मध्ये ई-लिलाव ईएमडी खाते क्रमांक COS370219, IFSC Code: COSB0000090 **दि. ०३.०१.२०२५ रोजी दु. ४.०० वाजेपर्यंत** किंवा त्यापूर्वी जमा करता येईल.

सदरची १५ दिवसांची नोटीस नियम ८(६) आणि ६(२) एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट,२००२ अन्वये कर्जदार, भागीदार, जामिनदार व मॉर्गेजर यांना सुध्दा लागू आहे.

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्ती बँकेच्या वेबसाइटवर **https://www.cosmosbank.com** व **https://cosmosbank.auctiontiger.net** येथे उपलब्ध आहे.

**अजित श्रीनिवास कुलकर्णी**
**मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी**
**दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि.**

**दिनांक :** १२.१२.२०२४
**ठिकाण : छत्रपती संभाजीनगर**